# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०१७
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

(क) : **सर्वश्री.रामहरी रुपनवर,** कपिल पाटील, रामराव वडकुते, संजय दत्त, किरण पावसकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा – (सकाळी १०.०० ते १०.५५ वाजेपर्यंत) – (मंत्र्यांच्या उत्तरासह ५५ मिनिटे) –**

"गेल्या अनेक वर्षापासून धनगर समाज हा एस.टी. आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी वेगवेगळी आंदोलने राज्यभर करीत आहे, हे सरकार येण्यापूर्वी मा.मुख्यमंत्री यांनी बारामतीमध्ये मोर्चास सामोरे जाता आमचे सरकार सत्तेत आल्यानंतर धनगर समाजाला घटनेने दिलेल्या एस.टी. प्रवर्गाच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासंबंधीच्या प्रस्तावास पहिल्या कॅबीनेटमध्ये मंजूरी देण्यात येईल असे आश्वासन देऊनही गेल्या साडेतीन वर्षापासून हा विषय प्रलंबित ठेवला आहे. यापूर्वी अधिवेशनामध्ये हा विषय अनेकवेळा चर्चेसाठी आला. परंतु त्यावर काहीही ठोस निर्णय न होणे, राज्य सरकारने धनगर समाज आरक्षणासंदर्भात अभ्यास करण्यासाठी टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स या संस्थेची नियुक्ती केली करणे, या संस्थेचा अहवाल राज्य सरकारला प्राप्त होवूनही सरकारने जाणूनबुजून वेळकाढूपणाचे धोरण अवलंबणे, त्यामुळे जनतेत तीव्र असंतोष पसरणे, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी धनगर समाजाने विधानभवनावर भव्य मोर्चा काढून आपला असंतोष प्रकट करणे, सोलापूर विद्यापीठास अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याचे मुख्यमंत्र्यांनी आश्वासन देऊनही त्यावर अंमलबजावणी करण्यात आलेली नसणे, यामुळे धनगर समाजामध्ये या सरकारविरोधात तीव्र नाराजी पसरणे, धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत सरकारने ताबडतोब निर्णय घेऊन या समाजास न्याय द्यावा, अशी धनगर समाजाची मागणी, परंतू राज्य सरकारचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, त्यामळे जनतेमध्ये पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(ख) : **डॉ. (श्रीमती) नीलम गोऱ्हे,** ॲड. अनिल परब, सर्वश्री. प्रविण दरेकर, विजय ऊर्फ भाई गिरकर, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा – (सकाळी १०.५५ ते ११.४५ वाजेपर्यंत) – (मंत्र्यांच्या उत्तरासह ५० मिनिटे)–**

"बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासीपाडे आणि अधिकृत झोपडपट्टीतील रहिवाशी यांना स्थलांतरीत करण्याबाबत शासनाने आखलेली उपाययोजना, सर्वसाधारण पात्र झोपडपट्टीवासियांच्या स्थलांतरासाठी शासनाने घ्यावयाचा सकारात्मक निर्णय, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सर्व्हे नं. २३९/१ या वन क्षेत्राची मोजणी करुन अतिक्रमित रहिवाश्यांचे त्याच क्षेत्रात पुनर्वसन करण्याबाबत

दिंडोशी येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१६ व त्यानंतर वारंवार मा.मुख्यमंत्री, मा.वने मंत्री व मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली मागणी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन्यप्राण्यांचा शहरात होणारा मुक्त संचार व त्यावर करावयाच्या उपाययोजना, मुंबई शहरातील नद्या व नाले यांच्या रुंदीकरणामुळे बाधीत होणाऱ्या रहिवाश्यांचे त्याचठिकाणी पुनर्वसन करणे, मुंबईतील भुमिपुत्र असलेल्या कोळीवाड्यातील बांधवांना कायमची घरे व कोळीवाड्यांचा पुनर्विकास करण्याची गरज, आशियाखंडातील सर्वात मोठ्या मुंबईतील धारावी येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याचा शासनाने घेतलेला महत्वकांक्षी निर्णय, सदरहू झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्यासाठी शासनाने आखलेली उपाययोजना, मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत आठ आमदारांच्या समितीने केलेल्या शिफारशीवर निर्णय घेण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, या प्रस्तावावर तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता, राज्यात पंतप्रधान आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ३३ हजार ५०० व इतरांसाठी ६२५० घरे उभारण्याची म्हाडाने आखलेली उपाययोजना, मुंबईसोबतच पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, नागपूर, नाशिक व सर्व महाराष्ट्रात स्वस्त घरांच्या योजनांना गती देण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे -**

**(क)** सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.हेमंत टकले व इतर वि.प.स. यांचा "**विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने वैद्यकीय व अभियांत्रिकीचे प्रवेश रद्द केल्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३४६७७.

**(ख)** गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.किरण पावसकर व इतर वि.प.स. यांचा "**मुरुड-जंजिरा, बोर्ली, काशिद, बारशीव व नांदगाव (जि.रायगड) येथील अनधिकृत बांधकामाबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३५७८२.

**(ग)** गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स. यांचा "**नागपूर शहरात मिनरल वॉटरच्या नावाखाली थंड पाण्याची विक्री होत असल्याबाबत**" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ३५१५१.

**(घ) तारांकित प्रश्न.**

**(ङ) तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** : "**कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील पाणी टंचाईवर उपाययोजना करण्याबाबत**" या विषयावरील श्री.रामराव वडकुते, वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३२२८२ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**(च) अतारांकित प्रश्नोत्तरांची आठवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : मा.सभापती यांचा प्रस्ताव -**

**"प्रसिध्द मराठी कवी श्रीकांत देशमुख यांना २०१७ चा 'साहित्य अकादमी पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल अभिनंदनपर प्रस्ताव."**

**तीन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे —**

**(क) मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख) वित्त मंत्री** :

**(१)** "महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम-६ (१) नुसार सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

**(२)** "लोकलेखा समितीच्या सन २००१-२००२ या वर्षाच्या आठव्या अहवालातील परिच्छेद क्र. १.२८ मध्ये समितीने केलेल्या शिफारशींनुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात केलेल्या पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग) अल्पसंख्याक विकास मंत्री** : "मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा बारावा वार्षिक अहवाल"

सभागृहासमोर ठेवतील.

(घ) **गृहनिर्माण मंत्री** : (१) "शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचा सन २००८-२००९, २००९-२०१०, २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे दहावा, अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांचे सन २०१५-२०१६ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

(ङ) **उद्योग मंत्री** : "मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(च) **सामाजिक न्याय मंत्री** : "महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(छ) **कामगार मंत्री** : (१) "नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर यांचा सन २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षांचा अनुक्रमे सातवा व आठवा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) "नागपूर व वर्धा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर यांचा सन २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे सदतीसावा, अडतीसावा व एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) "रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, रायगड (रायगड जिल्ह्याकरीता) यांचा सन २०११-२०१२, २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे दहावा, अकरावा, बारावा, तेरावा व चौदावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) "सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा, नवी मुंबई यांचा सन २०१२-२०१३

या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(५)** "मुंबई भाजीपाला बाजार असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई यांचा सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे अठ्ठावीसावा, एकोणतीसावा, तीसावा व एकतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(६)** "अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, अमरावती यांचा सन २०१३-२०१४, २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे पहिला, दुसरा व तीसरा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**चार : "लोकलेखा समितीचा एकतिसावा अहवाल सादर करणे."**

**पाच "सार्वजनिक उपक्रम समितीचा पंधरावा अहवाल सादर करणे."**

**सहा : "पंचायती राज समितीचा पहिला व दुसरा अनुपालन अहवाल तसेच आठवा व नववा अहवाल सादर करणे."**

**सात : विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवणे —**

**श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.** : **"नाशिक जिल्ह्यात खरवंडी व देवदरी (ता.येवला) गावाजवळील मन्याड नदीच्या २ मोठ्या नाल्यांच्या संगमावर प्रस्तावित देवना साठवण बंधाऱ्याच्या कामास विलंब होत असल्याबाबत"** या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

**आठ : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

(१) **ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३०** वर **मुख्यमंत्री** निवेदन करतील:-

"रा.हातगांव, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला येथे स्वर्गीय रविंद्र महादेवराव गोपकर, जि.प. जिल्हा नियोजन समितीचे सदस्य व स्वर्गीय जयंत प्रभाकर देशपांडे यांची दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी तुरखेडा फाटा येथे केलेली निघृण हत्या."

(२) **श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक

महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३१** वर **महसूल मंत्री** निवेदन करतील :-

"मौजे आगरनांदूर, ता.गेवराई, जि.बीड शिवारातील सर्व्हे नं.१७ (गट नं.४०) मधील ३० एकर २५ गुंठे शेत जमीन शहेशंहावली दर्गा, बीड यांची इनाम जमीन असतांनाही या जमीनीवर खाजगी व्यक्तींनी अतिक्रमण केल्याबाबत."

(३) **आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २७** वर **मराठी भाषा मंत्री** निवेदन करतील :-

"अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीमध्ये दुप्पटीने वाढ करण्याबाबत."

(४) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २६** वर **गृहनिर्माण मंत्री** निवेदन करतील :-

"मुंबई विभागअंतर्गत काळाचौकी, नागपाडा, भायखाळा, मदनपुरा, आग्रीपाडा, सातरस्ता इ. परिसरातील उपकरप्राप्ती इमारतींची दुरूस्ती करण्याकरीता कोट्यावधी रुपयांची बनावट बिले तयार करून केलेला गैरव्यवहार."

(५) **श्री.किरण पावसकर, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २९** वर **गृहनिर्माण मंत्री** निवेदन करतील :-

"स्वयंभू कोकण गृहनिर्माण मागासवर्गीय सहकारी संस्था (नियोजन) या संस्थेस विनियम १३(२) अंतर्गत प्रतिक्षानगर, सायन येथे ८४ सदनिकांसाठी योजना राबविण्याची मंजूरी प्राधिकरणाने ठराव मंजूरी करून घेण्याबाबत."

(६) **श्री.विक्रम काळे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३२** वर **वैद्यकीय शिक्षण मंत्री** निवेदन करतील :-

"औरंगाबाद, घाटी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील सीव्हीटीएस विभागातील कॅथलॅबचा सुटा भाग नादुरुस्त झाल्याने कॅथलॅब बंद पडलेला असणे."

(७) **श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक ३३** वर **पर्यावरण मंत्री** निवेदन करतील :-

"उल्हास नदीपात्रातून ठाणे जिल्ह्यातील अनेक शहरांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याने व दिवसेंदिवस उल्हास नदीतील प्रदूषण

वाढत असल्याने संपूर्ण ठाणे जिल्ह्यातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येणे."

(८) **श्री.धनंजय मुंडे, वि.प.स.** यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील **सूचना क्रमांक २५** वर **ऊर्जा मंत्री** निवेदन करतील :-

"महाराष्ट्र वीज नियामक आयोगाची स्थापना सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेली असणे, परंतू सर्वसामान्य वीज ग्राहकांना संरक्षणाऐवजी खाजगी वीज वितरण कंपन्याच्या भल्यासाठी आयोग कार्यरत असल्याबाबत."

**नऊ : (क) लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) — (अनुक्रमांक (१)) —**

(१) **श्री. विक्रम काळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील १८८ केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान मिळणेबाबत तसेच राज्यातील वि.जा.भ.ज. च्या आश्रमशाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर स्वतंत्र शाळासंहिता तयार करण्यात येणे, प्रारुप तयार होऊन बराच कालावधी होणे, या शाळांना शिक्षण विभागाच्या धर्तीवर शिक्षण हक्क कायदा लागू करण्याची आवश्यकता, या विषयी मराठवाडा विभाग शिक्षक लोकप्रतिनिंधीकडून वेळोवेळी सभागृहात प्रश्न उपस्थित होणे, संबंधित शाळांची तपासणी करुन त्यांचे अ, ब, क व ड असे वर्गीकरण करण्यात येणे, या केंद्रीय आश्रमशाळांना अनुदान देण्याचा व वि.जा.भ.ज. च्या आश्रमशाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर स्वतंत्र शाळासंहिताबाबत शासन लवकरच निर्णय घेईल असे मंत्री महोदयांनी सभागृहात वारंवार आश्वासन देणे, त्या आश्वासनाची पूर्तता अद्यापपर्यंत न होणे, त्यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **ॲड. निरंजन डावखरे,** सर्वश्री. नरेंद्र पाटील, किरण पावसकर, हेमंत टकले, सुनिल तटकरे, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे मेट्रो प्रकल्पाअंतर्गत वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या दरम्यान मेट्रो प्रकल्प-४ ला शासनाद्वारे मान्यता देण्यात येणे, या प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने सल्लागार कंपनीची नियुक्ती केली

असल्याचे दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यानुसार या प्रकल्पाचे संकल्पचित्र, खरेदीकरिता सहाय्य करणे, बांधकामाचे व्यवस्थापन, देखरेख, एकत्रित प्रणाली चाचणीसह संपुर्ण मार्ग सुरु करण्याची जबाबदारी या सल्लागार कंपनीवर सोपविण्यात येणे, तथापि ३ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी होऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, परिणामी सदर डी.बी. इंजिनियरिंग अॅण्ड कन्सल्टिंग, जीएमबीएचसह हिल इंटरनॅशनल इंक आणि ल्युईस बर्जर कन्सल्टिंग या संयुक्त सल्लागार कंपनीस मोठ्याप्रमाणात फीची रक्कम अदा करुनही प्रकल्पाची कार्यवाही सुरु न झाल्यामुळे ठाणे परिसरातील जनतेमध्ये निर्माण झालेले नैराश्याचे निर्माण झालेली वातावरण व शासनाप्रती संतापाची भावना, ठाणे जिल्ह्याची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या व प्रवासी संख्या लक्षात घेता, ठाणे मेट्रो प्रकल्प तातडीने सुरु करण्याबाबत सर्व स्तरावरुन होत असलेली मागणी, त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. सुनिल तटकरे,** धनंजय मुंडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र अधिनियम ३०/२०१७ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये असलेल्या कलम ४२ व ४२ क मधील काही तरतूदींच्या अनुषंगाने व शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एन.पी.ए.२०१६/प्रक्र७/टी१ दिनांक २२ जानेवारी, २०१६ च्या अंमलबजावणीत सुसूत्रता व प्रभावीपणा आणण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १३ (७) नुसार शासनास अधिकार असणे, या अधिकारानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे, नागपूर प्राधिकरण किंवा विशेष नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात ज्या ठिकाणी अद्याप विकास आराखडा अंतिमरित्या प्रसिध्द झालेला नाही अशा ठिकाणी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४२ ब मधील तरतूदी लागू होत नाहीत अशा बाबतीत कार्यवाही करणे विषयी दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला असणे, प्रारूप विकास आराखडा प्रसिध्द झालेला नसेल किंवा अंतिम प्रादेशिक विकास आराखडा लागू असेल तर कलम ४२ अन्वये व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १८ मधील तरतूदीनुसार बांधकाम परवानगीची कार्यवाही करण्याविषयीची सुचना दिलेली असणे, संबंधित नियोजन प्राधिकरणाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जागेचा भोगवटादार, धारणाधिकार याबाबत माहिती घेण्याविषयीचे

प्रयोजन असणे, रुपांतरण कर अकृषक आकारणी तसेच यथास्थिती नजराणा अधिमुल्य व इतर शासकीय देणी किती आहेत याची माहिती असणे, संबंधित व्यक्तीने कोणत्या सदरी शासकीय देय भरणे याची सूचना असणे, जिल्हाधिकाऱ्याने नियोजन प्राधिकरणास जास्तीत जास्त १ महिन्याच्या कालावधीत ही माहिती देणे बंधनकारक असणे, ही योजना घोषित करतेवेळी शासनाकडून बिनशेतीसाठी खूप सुलभ प्रक्रिया केल्याचे मा.मंत्री महोदयांनी सभागृहात सांगणे, सामान्य नागरिकांना व शेतकऱ्यांना याचा खूप मोठ्या प्रमाणात लाभ होईल असे जाहीर करणे, क्षेत्रीय स्तरावर मात्र या विषयी मोठ्या प्रमाणात संभ्रम असणे, बिनशेतीची प्रक्रिया पहिल्या पेक्षाही किचकट झाल्याने बांधकाम परवानग्या व अनुषंगिक कामे प्रलंबित असणे, अनेक विकास कामे रखडलेली असणे, जुनीच बिनशेती प्रक्रिया बरी होती की काय अशा प्रकारची भावना निर्माण झालेली असणे, याबाबतीत शासनाकडून सर्व गोष्टींचा खुलासा होणे आवश्यक असणे, त्यामुळे सद्यस्थितीत विकास आराखड्यातील ठप्प झालेली कामे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री. जयवंतराव जाधव, श्री. अमरसिंह पंडित,श्री. नरेंद्र पाटील वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नाशिक, जळगाव व अहमदनगर या जिल्ह्यातील ९ प्रकरणांमध्ये ग्रामपंचायत निवडणुकींबाबत चुकीचे निर्णय दिल्याप्रकरणी दिनांक १६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास विभागीय आयुक्तांनी संबंधित जिल्हाधिकारी व तहसिलदार तसेच कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाच्या कारवाईचे आदेश दिलेले असणे, नाशिक जिल्ह्यातील लखमापुर (दिंडोरी), चंदनपुरी (मालेगाव), कसबे सुकेणे (निफाड), अहमदनगर जिल्ह्यातील नवे नागापूर (नगर), आर्वी अनगरे, ढोरजा (श्रीगोंदा), पाचेगाव (नेवासा) या ग्रामपंचायतींसह शिरसोदे (ता.पारोळा जि.जळगाव) जिल्हापरिषद गटातील निवडणुकींमध्ये विजयी आणि पराभूत उमेदवारांबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय मान्य नसल्याने अपिलार्थिंनी विभागीय आयुक्तांकडे अपील केलेले असणे, माहे एप्रिल २०१५ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीतील तब्बल १८५३ उमेदवारांनी खर्च सादर न केल्याने त्यांचे सदस्यत्व रद्द करतानाच पुढील पाच वर्षांसाठी त्यांच्यावर निवडणूक लढविण्यासाठी बंदी घालण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेले असणे, तसेच पराभूतांनाही पाच वर्ष बंदी घालण्यात आलेली असणे, या अन्यायकारक कारवाईबाबत काही सदस्यांनी विभागीय आयुक्तांकडे

दाद मागितलेली असणे, त्यांनी या प्रकरणाचा बारकाईने तपास केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा, अर्धवट माहिती आणि अन्यायकारी निकालाचे वास्तव समोर आलेले असणे, कुठलेही पुरावे न तपासता, फेरचौकशी न करताच निकाल दिल्याने लोकशाहीचीच पायमल्ली झाल्याचे निदर्शनास आणून देत विभागीय आयुक्तांनी थेट जिल्हाधिकारी व तहसिलदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढलेले असणे, केवळ निवडणुकीचा खर्च वेळेत सादर केला नाही म्हणून सदस्यत्व रद्द करणे किंवा बंदी घालणे योग्य नसणे, उच्च न्यायालयानेच असे आदेश २०१० साली साहेबराव पाटोळे विरुद्ध महाराष्ट्र राज्य यांच्या तक्रारीत दिलेले असतानाही जिल्हाधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केलेले असणे, परिपूर्ण माहितीशिवाय न्यायदान करणे ही अक्षम्य चूक असणे, आतापर्यंत झालेल्या सुनावणीत अनेक कायदेशीर बाबींनाही डावलण्यात आल्याचे विभागीय आयुक्तांनी स्पष्ट केलेले असणे, न्यायिक संकेत न पाळताच त्यांनी हे आदेश दिल्याचे उघड झाल्याने विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निकालावर ताशेरे ओढत त्यांनी दिलेले सर्व आदेश रद्द केलेले असणे, इतकेच नव्हे तर यासंदर्भात जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवरही शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश दिल्याने महसूल विभागात प्रचंड खळबळ उडालेली असणे, या अपिलांवर आदेश देतांना आयुक्तांनी संबंधित जिल्हाधिकारी, तहसीलदार, अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाच्या कारवाईचे आदेश दिलेले असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **सर्वश्री. धनंजय मुंडे,** जयवंतराव जाधव, सुनिल तटकरे, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मौजे कोलशेत येथील सर्व्हे नं. ९९/२ ता. ठाणे, जि. ठाणे या औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित झालेल्या जमिनीचे शासनाच्या परवानगीशिवाय हस्तांतरण व वापरात बदल होणे, सदर शर्तभंगापोटी जमीन सरकारजमा करण्याचे उपविभागीय अधिकारी यांनी दोषपूर्ण आदेश निर्गमित करणे, सदरच्या आदेशाला अप्पर आयुक्त यांनी स्थगिती देणे, मौजे कोलशेत येथील सर्व्हे नं. ९९/२ ही जमीन भोगवटादार वर्ग २ असणे, जमिनीच्या इतर हक्कात नागरी कमाल जमीन धारणा कायद्याबाबतची नोंद असताना तसेच मौजे कोलशेत येथील सर्व्हे नं. ११४/४ व ११५/२ या जमिनीत आदिवासी कुळाच्या नोंदी असताना ठाणे महानगरपालिकेने या बाबी दुर्लक्षित करुन सर्व्हे नं.

९९/२, ११४/४ व ११५/२ यांना एकत्रित विकास परवानगी देणे, या तक्रारीची चौकशी होऊन विकास परवानगी रद्द करण्याबाबतचा विभागीय आयुक्त कोकण यांनी शासनास अहवाल देणे, सदर अहवालाच्या अनुषंगाने विकास परवानगी रद्द करण्याबाबत महानगरपालिका आयुक्त ठाणे यांना शासनाने कळविणे, औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित जमीन तसेच नागरी कमाल जमीन धारणा कायद्यांतर्गत अतिरिक्त असल्याबाबत जमीनीच्या पुर्व परवानगी शिवाय सर्व्हे नं. ९९/२, ११४/४ व ११५/२ याची एकत्रित विकास परवानगी देणे, सदर विकास परवानगी देताना सर्व्हे नं. ९९/२ च्या विकासहक्क वापरास मान्यता देणे, यामुळे शासनाला मिळणाऱ्या अनार्जित रकमेचे नुकसान होणे, संपादित जमिनीच्या सनदेतील तरतुदीनुसार आरक्षित जमीन नाममात्र किंमतीस महानगरपालिकेकडे वर्ग न करुन घेणे, सदर बाबींत वारंवार तक्रार केल्यानंतरही अद्यापपावेतो सदर जमिनीची विकास परवानगी रद्द न होणे, तसेच सदर जमीन शर्तभंगापोटी सरकारजमा न झाल्यामुळे विकासकाने सदर जागेवर काम सुरु ठेवणे, सदर प्रकल्पातील सदनिकांची विक्री करण्यात येणे, यातून होणारे शासनाचे व सर्वसामान्य गुंतवणूकदारांचे नुकसान टाळण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

(६) **श्री. विनायकराव मेटे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यामध्ये मौजे गोंदी येथे गोदावरी नदीवर वाळूचा धक्का असणे, या धक्क्यावर जिल्हाधिकारी यांच्या अंतर्गत अधिकृत निविदा काढून सर्वात जास्त बोली लावणाऱ्या ठेकेदाराला सदरील ठेका दिला जात असणे, मौजे गोंदी येथे येथील अनधिकृत वाळू साठ्याचा दिनांक २० जून, २०१७ रोजी गट क्र. २०९ व २११ मध्ये जवळपास ५०० ब्रास वाळूसाठा जप्त केल्याचा पंचनामा करण्यात येणे, त्या साठ्याच्या लिलावाकरिता तहसीलदार यांनी निविदा काढणे, परंतु सदरील वाळूसाठयाबाबत जिल्हाधिकारी यांना संशयास्पद माहिती मिळताच त्यांनी जिल्हा पथकासह प्रत्यक्ष पंचनामा करणे, या पंचनाम्यादरम्यान प्रत्यक्ष अनधिकृत वाळूसाठा हा ३१७१ ब्रास असल्याचे उघडकीस येणे, त्याअर्थी तहसीलदार यांनी केलेला पंचनामा व जिल्हाधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्यात जवळपास २७०० ब्रास फरक येणे, दुसऱ्या प्रकरणात घनसावंगी तालुक्यातील मौजे जोगलादेवी येथे घनसावंगी येथील तहसिलदारांनी दिनांक २८ जून, २०१७ रोजी गट क्र.१९, २०

गावठाण व आजूबाजूच्या परिसरातील २८०१ ब्रास अनाधिकृत वाळू साठ्याचा पंचनामा करणे, सदरील वाळूसाठयाचा लिलाव जाहीर प्रकटनाव्दारे दिनांक ३० जून, २०१७ रोजी ठेवण्यात येणे, दिनांक १० जुलै, २०१७ रोजी या अनाधिकृत वाळू साठ्याचा लिलाव होऊन याची अनामत रक्कम ठेकेदाराने एकूण ६,३०,२२५ रुपये धनादेशाव्दारे तहसिलदार यांच्या नावे देण्यात येणे, दिनांक १५ जुलै, २०१७ रोजी जिल्हाधिकारी यांनी संशयास्पद हालचालीवरुन जिल्हा पथकाच्या सहाय्याने पंचनामा केला असता हा वाळूसाठा ६८०९ ब्रास भरणे, याच कारणावरुन जिल्हाधिकारी यांनी बोलीधारकाला त्यांनी भरलेली रु. ६,३०,२२५ इतकी रक्कम परत करण्यात येणे, तहसीलदार यांनी केलेला पंचनामा व जिल्हाधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्यात जवळपास ३००० ब्रासचा फरक असणे, या दोन्ही प्रकरणांत तहसीलदार, अंबड व तहसीलदार , घनसावंगी यांनी हजारो ब्रास वाळूची परस्पर विल्हेवाट लावून ठेकेदाराच्या संगनमताने लाखो रुपयांचा आर्थिक घोटाळा करण्याचे षडयंत्र जिल्हाधिकारी यांच्या सर्तकतेमुळे उघडकीस येणे, जप्त् वाळूसाठयाचा पंचनामा, निविदा व गाडयांची वाळू नेण्याकरीताचे सी.सी.टीव्ही. फुटेज जिल्हाधिकारी यांच्याकडे दररोज जमा करणे तहसीलदारांना आवश्यक असणे, परंतु अंबड व घनसावंगी तहसिलदार यांनी कुठेही सी.सी.टीव्ही. न लावणे, यामध्ये दोन्ही तहसीलदार, गौण खनीज अप्पर जिल्हाधिकारी मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार व तलाठी यांनी संगनमताने भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस येणे, याद्वारे शासनाची झालेली फसवणूक, यासंदर्भात शासनाने दोषींवर फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(७)** **सर्वश्री. आनंदराव पाटील,** अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सातारा जिल्हयात सन १९६७-१९६८ मध्ये झालेल्या भूकंपामुळे नदीकाठची अनेक गावे विस्थापित होणे, येथील कराड तालुक्यातील मौजे गोठे या गावासह या भूकंपग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्यात येणे, परंतु शासनाने अद्याप या पुनर्वसित गावठाणांमध्ये प्लॉट धारकांच्या नोंदी न करणे, त्यामुळे येथील विकासकामांत अडचणी निर्माण होणे, शासनाचा विकासनिधीसुध्दा वापरता न येणे, त्यामुळे या गावठाणात नळपाणी योजना, अंगणवाडी, समाजमंदिर, रस्ते इ. विकासकामे हा निधी परत जात असल्याने येथील ग्रामस्थ मुलभूत सुविधांपासून व शासकीय लाभांच्या योजनांपासून वंचित राहत

असतानाही शासन त्याकडे करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील ग्रामस्थांत निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, त्यामुळे शासनाने येथील प्लॉटधारकांच्या नोंदी घेऊन त्यांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **सर्वश्री. सुभाष झांबड,** अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, संजय दत्त, रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री. आनंदराव पाटील, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. हरिसिंग राठोड, अमरनाथ राजूरकर, मोहनराव कदम **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सिल्लोड तालुक्यातील (जि.औरंगाबाद) ग्रामीण भागातील विद्यार्थी अद्याप सोयी सुविधांपासून वंचित असल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ रोजीवा त्यासुमारास निदर्शनास येणे, येथील विद्यार्थ्यांना दप्तर, वहया, पेन्सील, पेन गणवेश इ. शैक्षणिक साहित्य वेळेवर उपलब्ध न होणे, शिष्यवृत्तीही दरवर्षी रखडणे, येथील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी बससेवा उपलब्ध नसणे, यामुळे येथील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पायाच खालावत असतानाही शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील विद्यार्थी व पालकवर्गात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने येथील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्याचा आढावा घेऊन त्या सोडविण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री. श्रीकांत देशपांडे,** दत्तात्रय सावंत, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील अशासकीय शाळांमध्ये मागील १६ ते १७ वर्षांपासून १०६७ अर्धवेळ ग्रंथपालांना अर्धवेतनी पगारावर काम करावे लागत असणे, वास्तविक सदर अर्धवेळ ग्रंथपालांना पूर्णवेळ ग्रंथपालाप्रमाणेच सर्व कामे असतांना व तसा अभिप्राय शिक्षण संचालकांनी दिलेला असताना देखील वर्षानुवर्षे राज्यातील १०६७ अर्धवेळ ग्रंथपालांवर अन्याय होत असल्याने त्यांच्यात व त्यांच्या कुटुंबियात पसरलेली नाराजीची भावना, शालेय शिक्षणमंत्री यांना दिनांक ८ नोव्हेंबर २०१३ व त्या अगोदर अनेकवेळा निवेदने, पत्रव्यवहार करूनही अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, याबाबत त्वरीत निर्णय घेवून उक्त अर्धवेळ ग्रंथपालांना त्वरीत पूर्णवेळ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने

तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **सर्वश्री. दत्तात्रय सावंत,** श्रीकांत देशपांडे, बाळाराम पाटील, विक्रम काळे, डॉ. सुधीर तांबे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त अनुदानित उच्च माध्यमिक शाळातील सन २००३-२००४ ते २०१०-२०११ वर्षातील वाढीव शिक्षकांच्या ९२६ पदांना दिनांक २१ मे २०१४ च्या शासन आदेशाने मान्यता देण्यात येणे, सदर पदांच्या मान्यतेस अधीन राहून विभागीय उपसंचालकानी बिंदू नामावली प्रमाणे संबंधित शिक्षण संस्थेतील प्राध्यापकांना वैयक्तिक मान्यता देणे, पदव्युत्तर शिक्षण घेऊन १४ ते १५ वर्षे अध्यापनाचे कार्य विना वेतन करण्याची वेळ संबंधितावर येणे, सदर वाढीव पदांपैकी राज्यातील १७१ पदांना आजपावेतो आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद करण्यात आलेली नसणे, वेतनासाठी लागणारा निधी शासनाकडून मंजूर करण्यात न येणे, त्यामुळे उच्च विद्या विभूषित तरुणांचा शिक्षणाच्या क्षेत्राकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे, पूर्णवेळ काम आणि शून्य दाम यामुळे आर्थिक समस्येला तोंड द्यावे लागणे, तसेच सन २०११-२०१२ पासून अनुदानित कार्यभारातून निर्माण झालेली पदे राज्यातून विभागीय उपसंचालक कार्यालाकडून मंजूर होऊन ती पदे मंजुरीसाठी गेली अनेक दिवस शासन स्तरावर प्रलंबित असणे, सदर पदे घोषित करून तात्काळ अनुदान मिळावे म्हणून संबंधितानी अर्ज विनंत्या आंदोलने करणे, लोकप्रतिनिंधीकडून यासाठीची वारंवार मागणी करण्यात येणे, तरी सदर पदांना चालू अधिवेशनात आवश्यक असणाऱ्या निधीची तरतूद करून विना वेतन कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना न्याय देण्याबाबत शासनाने करावयाचे प्रयत्न व शासनाची भूमिका."

(११) **डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विशेषतः शहरी भागातील महिला नोकरीनिमित्त घराबाहेर असल्याने त्यांच्या मुलांचा सांभाळ करण्याकरिता त्यांना पाळणाघराचा आसरा घ्यावा लागणे, परंतु या पाळणाघरात राहत असलेली मुले असुरक्षित असल्याचे यापूर्वी घडलेल्या अनेक घटनांमधून दिसून येणे, याकरिता शासनाने पाळणाघरांची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात येणे, परंतु या समितीने आतापर्यंत एक ही बैठक न घेणे, त्यामुळे पाळणाघरांच्या कार्यपध्दतीकरिता नियमावली तयार न होणे, राज्यात राजीव गांधी पाळणाघर योजनेअंतर्गत १८९५

पाळणाघरे तसेच खाजगी पाळणाघरे कार्यरत असून पाळणाघरांसाठी स्वतंत्र कायदा किंवा नियमावली नसल्याने काही पाळणाघरांमध्ये लहान बालकांना सांभाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून मारहाणीच्या प्रकारात होत असलेली वाढ, या घटनांमध्ये वाढ होत असल्याने राज्य महिला आयोगाने मुलांच्या संख्येनुसार पाळणाघरांची जागा, कर्मचारी, वैद्यकिय सेवा, मुलांचे संगोपन अशा विविध मुद्यांनुसार स्वतंत्रपणे नियमावली तयार करुन राज्य शासनास सादर करण्यात येणे, परंतु या नियमावलीसंदर्भात शासनाने अद्यापही कोणताच निर्णय न घेणे, यामुळे राज्यातील नोकरदार महिलांवर्गामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने उच्चस्तरीय समिती स्थापन करुन पाळणाघरांच्या कार्यपध्दतीकरिता नियमावली तयार करण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१२) **सर्वश्री. आनंद ठाकूर,** हेमंत टकले, सुनिल तटकरे, ॲड. राहुल नार्वेकर, श्री. ख्वाजा बेग, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

पालघर जिल्ह्यातील सुर्या धरणाचे पाणी वाणगांवच्या पश्चिमेस रेल्वे क्रॉसिंग करुन पाईपलाईनद्वारे नेऊन तेथील आदिवासी पाडयातील ओढे व नाल्यांमध्ये सोडण्याचा प्रकल्प सन २००६ मध्ये हाती घेण्यात येणे, मागील दोन वर्षात ९० टक्के काम पूर्ण होऊनही पाणी रेल्वे क्रॉसिंग करुन पश्चिमेला नेण्याचे काम प्रलंबित असल्यामुळे पश्चिमेकडील प्रगत शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्यापासून वंचित रहावे लागणे, परिणामी आदिवासी समाज व स्थानिक रहिवाश्यांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र नाराजी व संतापाची भावना, वाणगाव पश्चिम भागाला उन्हाळयात पाण्याची तीव्र टंचाई भासत असल्यामुळे सदर प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली कार्यवाही वा करावयाची उपाययोजना."

(१३) **सर्वश्री.बाळाराम पाटील,** नागोराव गाणार, विक्रम काळे, प्रा. अनिल सोले, श्री. गिरीशचंद्र व्यास **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कौशल्य विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सन १९९१ पासून प्रशासकीय आय.टी.आय मधील कर्मचाऱ्यांची नियुक्ती, पदमान्यता व १०० टक्के वेतन अनुदान मंजुरीसंबंधीचा प्रश्न मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, देशामध्ये कौशल्य विकासात औद्योगिक विकासात व आर्थिक विकासात क्रांती घडविणारी एन.सी.व्ही.टी-डी.जी.ई.टी ची एकमेव

प्रतिप्रभावी शिल्पकारागीर प्रशिक्षणयोजना ही शासकीय आय.टी.आय. व प्रशासकीय आय.टी.आय. मध्ये १०० टक्के समान रूपाने राबविली जात असणे, दोन्ही आय.टी.आय. मधील कर्मचाऱ्यांची जबाबदारी व कौशल्य विकासात भागीदारीसुद्धा १०० टक्के समान असणे, समान काम समान दाम या सिद्धांताच्याआधारे राज्यातील खाजगी आयटीआय मध्ये १०० टक्के वेतन अनुदानित करणे अत्यंत आवश्यक असणे, अशासकीय आय.टी.आय मधील कर्मचाऱ्यांना अत्यल्प वेतन मिळत असल्याने कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत खालावलेली असणे, अत्यंत हालाखीचे जीवन जगावे लागत असणे, या गंभीर व महत्वाच्या प्रश्नाबाबत शासनाकडे अनेकवेळा निवेदने, मागण्या देऊनही शासनाने अद्यापपर्यंत खाजगी आयटीआय मधील कर्मचाऱ्यांना न्याय दिलेला नसणे, परिणामी खाजगी आयटीआय मधील अधिकारी, निदेशक व कर्मचाऱ्यांमध्ये शासनाविषयी तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झालेले असणे, राज्यातील खाजगी आय.टी.आय. मधील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत व पदमान्यता निश्चित करून १०० टक्के वेतन अनुदान समान काम समान दाम या सिद्धांतावर शासनाने तातडीने निर्णय घेऊन न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(ख) लक्षवेधी सूचनेसंदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे —**

**मुख्यमंत्री** : (१) "**चार्म्स हेरिटेज गृहसंकुलावर त्यांच्या इमारतीतून मोकळया जागेत सोडण्यात येणारे सांडपाणी बंद करुन योग्य ती कारवाई करणे**" या विषयावरील ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेबाबत दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(२) "**पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक त्या सायी सुविधा पुरविणे**" या विषयावरील सर्वश्री किरण पावसकर व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेबाबत दिनांक ०२ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतील.

**(ग) लक्षवेधी सूचनेवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे - (जोडपत्र**

**पहावे.)**

**दहा : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

# - मध्यंतर -

**अकरा : शासकीय विधेयके -**

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६० - महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६३ - महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.

(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. (४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. (४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

**(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७१ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७१ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या २१ सदस्यांच्या

संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(५) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५७ - महाराष्ट्र साक्षीदारास संरक्षण व सुरक्षा देण्याबाबत विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री
(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.
(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.
(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.
(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.
(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.
(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.
(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.
(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.
(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

---

(६) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७२ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७"**

(७) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७३ - महाराष्ट्र न्यायालय-फी (सुधारणा) विधेयक, २०१७"**

(८) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७४ - महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

(ख) **विधानसभेने सुधारणांसह संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५६ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१७"**

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ५६ - महाराष्ट्र ग्रामपंचायत

(सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **दोन महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

| | |
|---|---|
| (१) ग्रामविकास मंत्री | (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स. |
| (३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स. | (४) श्री.संजय दत्त, वि.प.स. |
| (५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. | (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. |
| (७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स. | (८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. |
| (९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. | (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स. |

---

**(ग) विधानसभेने सुधारणांसह दुसऱ्यांदा संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

(१) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३८ - महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता (सुधारणा) विधेयक, २०१७"**

(२) **"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४१ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१७"**

---

**बारा : (गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव) —**

**सर्वश्री. शरद रणपिसे,** धनंजय मुंडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, जयंत पाटील, कपिल पाटील, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री. अमरसिंह पंडित, सुभाष झांबड, सतिश चव्हाण, प्रा.जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री.जयवंतराव जाधव, अमरनाथ राजूरकर, दत्तात्रय सावंत, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.किरण पावसकर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.जनार्दन चांदूरकर, ख्वाजा बेग, रामहरी रुपनवर, बाळाराम पाटील, आनंदराव पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, हरिसिंग राठोड, नरेंद्र पाटील, चंद्रकांत रघुवंशी, प्रकाश गजभिये, अमरीशभाई पटेल, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. मोहनराव कदम, जयदेव गायकवाड, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) —**

"संपूर्ण राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडलेली असणे, खून,

घरफोड्या, बँक दरोडे, चोऱ्या यासारख्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यात सरकारला अपयश येणे, अंमली पदार्थ, गुटखा, जुगार, मटका या अवैध धंद्यात प्रचंड वाढ होणे, अल्पवयीन मुले, मुली, महिलांवर व मागासवर्गीयांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होणे, वृध्दांवरील गुन्ह्यात झालेली वाढ, डान्सबारला आळा घालण्यात आलेले अपयश, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, नक्षलवादी कारवायात निष्पापांचा जाणारा बळी, शेतकऱ्यांवर पोलीसांकडून अमानुषपणे गोळीबार, सांगली जिल्ह्यात अनिकेत कोथळे याचा पोलीसांच्या भीषण मारहाणीत झालेला मृत्यु, बेपत्ता ए.पी.आय. अश्विनी बिद्रे प्रकरणात संशयीत आरोपी असलेल्या पोलीस अधिकाऱ्यास मिळालेले अभय, मंजूळा शेटे हत्या प्रकरणात दोषींना मिळत असलेले पोलीस संरक्षण, वाळू माफीयांकडून शासकीय अधिकाऱ्यांना जीवे मारण्याच्या घडलेल्या घटना, महापालिका आयुक्तांना सुध्दा धमक्या आलेल्या असणे, राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहर व परिसरातील वाढती गुन्हेगारी, गुंडांना पोलीसांमार्फत मिळणारे संरक्षण, दिवसा ढवळ्या होणाऱ्या खुनामुळे नागपूर शहरात दहशत पसरवून शहराची ओळख नागपूर ऐवजी गुन्हेपूर अशी होत असणे, पुणे, नागपूर, नाशिक यासारख्या शहरात संघटीत गुन्हेगारीने घातलेले थैमान, ऑनलाईन लॉटरीच्या नावाखाली होणारी फसवणूक, राज्यातील कैद्यांची वाढती संख्या व अपुरी पडत असलेली कारागृह व्यवस्था, कारागृहातील गैरप्रकारांना आळा घालण्यात आलेले अपयश, डॉ.नरेंद्र दाभोळकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या तपासात होणारा विलंब, समीर गायकवाड व विरेंद्र तावडे यांच्या विरुध्द ठोस पुरावे असूनही सनातन संस्थेवरील बंदीबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, फॉरॅन्सिक लॅबमधील मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदांमुळे शेकडो सॅम्पल प्रलंबित असणे, पोलीस दलातील रिक्त पदांमुळे पोलीसांवर पडणारा कामाचा वाढता ताण, परिणामी आयपीसी अंतर्गत होणाऱ्या दखलपात्र गुन्ह्यात महाराष्ट्र राज्य आघाडीवर असणे, पोलीस निवासस्थानांचा व त्यांचे विविध प्रश्न, समस्या सोडविण्याकडे झालेले दुर्लक्ष, राज्यातील ५५ लाखापेक्षा अधिक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असणे, ऑनलाईनच्या घोळामुळे त्यांच्यावर शिष्यवृत्तीपासून वंचित राहण्याची वेळ येणे, राज्याच्या विविध खात्यात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेला भ्रष्टाचार, घोटाळे, नोव्हेंबर, २०१७ मध्ये घोटाळेबाज शासन या नावाने वितरीत करण्यात आलेल्या पुस्तिकेतून राज्य मंत्रीमंडळातील अनेक मंत्र्यांची भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येणे, गृहनिर्माण विभागात १ हजार कोटीपेक्षा जास्त घोटाळा उघडकीस येऊनही कारवाई न होणे, माहिती तंत्रज्ञान विभागात वस्तू व सेवाच्या निविदांमध्ये घोळ असणे, त्यामुळे कर्जमाफी शिष्यवृत्ती सारख्या योजना राबविण्यात सरकारला अपयश येणे, राज्य मुल्यवर्धीत करामधून नैसर्गिक वायुला सवलत देताना

विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी साडेतीनशे कोटी रुपयांचा घोटाळा करणे, मत्स्यव्यवसाय विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मासेमारींच्या ठेक्यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झालेला असणे, पशुसंवर्धन विभागाच्या लाळ खुरकत लशीच्या खरेदी प्रकरणी प्रचंड अनियमितता झालेली असणे, त्यामुळे राज्यातील पशुधनाचे आरोग्य धोक्यात येऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न बुडण्याची दाट शक्यता निर्माण होणे, ग्रामविकास विभागाच्या राष्ट्रीय जीवनोन्नती अभियानात सॅनीटरी नॅपकीनच्या खरेदी निविदेत घोटाळा असणे, चिक्की खरेदी प्रकरणी ए.सी.बी.ने या गैरव्यवहाराची चौकशी न करता आरोप असलेल्या महिला व बालविकास विभागाकडे गैरव्यवहार झाला आहे काय अशी विचारणा करणे, ए.सी.बी. च्या अहवालामध्ये अनेक त्रुटी असणे, औद्योगिकरणाच्या वाढीसाठी उद्योग विभागामार्फत शेतकऱ्यांच्या जमीनींचे अधिग्रहण केले जात असतांना त्यांना योग्य मोबदला वेळेमध्ये दिला जात नसणे, या सर्व विभागामध्ये मनमानी कारभार सुरू असून विविध खात्यातील घोटाळ्यांमुळे भ्रष्ट सरकार म्हणून ओळख निर्माण होणे, या घोटाळ्यांची चौकशी होऊन कारवाई होत नसल्याचे सरकार भ्रष्टाचाराला पाठीशी घालत असल्याची भावना निर्माण होणे, भ्रष्टाचारी व्यक्तीची मालमत्ता जप्त करण्याचे शासनाने सन २०१४ ला ठरविलेले धोरण अंमलात न येणे, मुंबई विद्यापीठात पेपर तपासणीच्या कारणांमुळे सर्व शाखांचे रखडलेले निकाल, त्यामुळे विद्यार्थ्यांचे झालेले प्रचंड नुकसान, मुंबई विद्यापीठात झालेला गैरव्यवहार व अनागोंदी कारभार, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**तेरा : (मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर व गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**प्रा.अनिल सोले,** ॲड. अनिल परब, श्री.गिरीश व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, सर्वश्री. परिणय फुके, रविंद्र फाटक, श्रीमती स्मिता वाघ, सर्वश्री. तानाजी सावंत, मितेश भांगडिया, गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, विनायक मेटे, विजय ऊर्फ भाई गिरकर, सुजितसिंह ठाकूर, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात विदर्भातील सर्व जिल्हे व मराठवाड्यात पडलेला कमी पाऊस, त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेण्याची आवश्यकता, या भागातील सिंचनाचा अनुशेष वेगाने पूर्ण करण्याची गरज, विदर्भातील अपुरे सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याकरिता केंद्राच्या सहाय्याने तयार केलेली बळीराजा जलसंजीवनी योजना तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, बेंबळा प्रकल्पाच्या कामाला देण्यात आलेली गती, माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी भूमीपुजन केलेल्या गोसीखुर्द प्रकल्पाच्या सर्व परवानग्या प्राप्त

करुन प्रकल्पाची किंमत केंद्र शासनाने निश्चित करण्यासाठी झालेली कार्यवाही, अपुऱ्या पावसामुळे मूग, उडीद, सोयाबीन, कापुस, तूर व हरभरा इ.पिकांचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांवर येणे, डुक्कर, हत्ती इ. जनावारांमुळे होणारे शेतीचे नुकसान रोखण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, पाणंद रस्त्यांचे बांधकाम व मजबुतीकरण प्राधान्याने करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या उद्देशाने उत्पादन खर्च कमी करणे, नैसर्गिक व सेंद्रिय शेती आणि फळबागांच्या लागवडीस प्रोत्साहन देणे, संत्राउद्योग, दुग्धव्यवसाय, कुकुटपालन, मत्स्यव्यवसाय इ. शेतीच्या जोडधंद्यांना प्रोत्साहन देणाऱ्या योजना कार्यान्वित करणे, शेतमालाला किमान हमीभावाप्रमाणे दर मिळण्याची व जेथे कमी भाव असेल तेथे अनुदान देण्याची गरज, जलयुक्त शिवार योजनेमुळे शाश्वत सिंचनाच्या सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात आलेली गती, ही योजना अधिक प्रभावी करण्याकरिता या योजनेच्या अटी व निकष शिथिल करण्याची आवश्यकता, कृषीपंपांना दिवसा १२ तास वीज उपलब्ध करण्याच्या दृष्टीने सोलर फिडरची योजना कार्यान्वित करणे व वीजपंप जोडणीच्या प्रलंबित अर्जांचा डिसेंबर, २०१७ पर्यंत शीघ्रगतीने निपटारा करण्याची आवश्यकता, राज्यातील वीज वितरण व्यवस्था अधिक मजबुत करण्यासाठी नविन उपकेंद्र, रोहित्र व पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, सिंचन अनुशेषाच्या भागात अधिक अनुदान देण्याची गरज, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमध्ये शासनाने ४ हजार ५०० कोटी रुपये उपलब्ध करुन दिले असणे, त्यामुहे ५ हजार गावांमध्ये शेती उत्पादन वाढून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे व शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध झाली असणे, आत्महत्याग्रस्त ६ जिल्ह्यांपेक्षा एकट्या मुंबईला अधिक कर्जमाफी देण्याचे पूर्वीच्या शासनाने धोरण असताना अवघ्या ५ महिन्यात संपूर्ण राज्यभरात कर्जमाफीची प्रक्रिया गतीने पूर्णत्वाकडे येणे, कृषी खात्यातील रिक्त पदे तातडीने भरणे व आशाच्या धर्तीवर शेतकरी मित्र नेमण्याची आवश्यकता, केंद्र शासनाने नदीजोड प्रकल्प राज्यात कार्यान्वित करण्याची आवश्यकता, एमआरईजीएस मध्ये मोठ्या प्रमाणात सिंचन विहिरी करण्याची आवश्यकता, कृषीमालावर आधारित प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी विशेष आर्थिक क्षेत्र उभे करण्याची आवश्यकता, विदर्भाच्या समग्र विकासाला वेग देण्याची आवश्यकता, अमरावती भागात उभारण्यात येणाऱ्या टेक्सटाईल पार्कला अधिक गती देण्याची आवश्यकता, मोर्शीत संत्रा प्रक्रिया प्रकल्प सुरू करणे व संत्रा धोरण जाहिर करणे, मिहानमध्ये मोठ्या संख्येने येत असलेली गुंतवणूक, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना यशस्वीपणे व पारदर्शकरित्या राबविल्यामुळे शेतकरी पुन्हा कर्ज घेण्याकरिता पात्र होणे, मागील ३ वर्षात शासनाने शेतीमधील गुंतवणूक वाढविल्यामुळे शेतीचा विकास दर सतत

नकारात्मक राहत असताना हा दर प्रथमच + १२.५ टक्क्यांवर नेण्यास शासनास आलेले यश, राज्यातील शेतकरी कायमस्वरुपी स्वबळावर उभा राहू शकेल व त्याला भविष्यात कर्ज घेण्याची पाळी येणार नाही या दृष्टीने योजना आखून त्या तातडीने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

**चौदा** : **अशासकीय विधेयके :-**

**(क) पुर:स्थापनार्थ -**

**(१)** सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ८ - महाराष्ट्र सार्वजनिक सुरक्षा (उपाययोजना) अंमलबजावणी विधेयक, २०१७ - श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ९ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ - श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे

**(ख) विचारार्थ -**

**(१)** सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक २ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ - श्री.नरेंद्र पाटील, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०१७ - श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे

**(३)** सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २३ - बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

**(४)** सन २०१५ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१५ - श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.

## "राष्ट्रगीत."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : २१ डिसेंबर, २०१७.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.